





दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २६२ ●रविवार,दि.२१ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# २६४ नगरपरिषद, नगरपंचायतीत आज मतमोजणी,
# राज्यातील मतदार कोणाला कौल देणार?

**बीड । प्रतिनिधी**

राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातल्या बीड, गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई, धारूर या सहा नगरपालिका अध्यक्षांसह नगरसेवकांसाठी दोन डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. तब्बल १९ दिवसांच्या प्रतिक्षेनंतर आज या निवडुकांचा निकाल मतमोजणीतून होणार असून या निकालाकडे आता अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. निकालाचे काऊन्टडाऊन सुरू झाले असून संबंधित नगरपालिकांवर कोणाचे अधिराज्य असणार हे आज निकालातून स्पष्ट होईल.

परळी वगळता जिल्ह्यातल्या अन्य पाच नगपालिका निवडणुकीमध्ये महायुतीतील आणि आघाडीतील पक्ष आमने-




**● आज सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला त्या त्या शहरामध्ये सुरुवात होणार आहे. मतमोजणीची पुर्ण तयारी प्रशासनाकडून करण्यात आली असून या शहरांवर कोणाचे वर्चस्व असणा ? हे अवघ्या २० तासांमध्ये समोर येणार आहे. तसे काऊन्टडाऊन सुरू झाले आहे.**

सामने येत निवडणूक लढवल्याने अनेक ठिकाणी तिरंगी लढत पहायला मिळाले. अत्यंत चुरशीची आणि प्रतिष्ठेची ही निवडणूक असून सहाही शहरांमध्ये आपलेच अधिराज्य असावे यासाठी त्या त्या मतदारसंघातील नेतृत्वांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. गेवराईत भाजपा विरुद्ध अजितदादांची राष्ट्रवादी यांच्यात सरळ लढत झाली. तर बीडमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी भाजपा आणि शरद पवारांची राष्ट्रवादी अशी तिंरगी लढत होऊन एमआयएम, बहुजन वंचित आघाडी आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांच्या उमेदवारांनी या निवडणुकीत आपली ताकद लावली. त्यामुळे बीडमध्ये कोणाचे वर्चस्व असणार? याकडे प्रामुख्याने जिल्ह्याचे लक्ष आहे. तिकडे माजलगावमध्ये आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी चा पॅनल आणि भाजपा यांच्यात लढत पहायला मिळाली. अंबाजोगाईत भाजपाच्या आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा हे आघाडी घेऊन रिंगणात उतले तर अजितदादांच्या राष्ट्रवादी कडून पापा मोदी हे आघाडी करून मुंदडांना शह देण्यासाठी रणांगणात होते ▶ उर्वरित पान २ वर

## निकालानंतर विजयी मिरवणुकांवर बंदी
## एस.पी. आणि कलेक्टरांचे आदेश



**बीड । प्रतिनिधी**

आज नगर पालिका निवडणुकांची मतमोजणी जिल्हाभरात होत असून निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर कोणत्याही जय पक्षाला अथवा गटाला विजयी मिरवणूक काढण्याची परवानगी देण्यात आलेली नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी दिली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी आज होणाऱ्या निवडणूक निकाला संदर्भात आदेश जारी केले आहेत. यात मतमोजणी प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व कायद्याच्या वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी मतमोजणी केंद्र परिसरात, गर्दी, घोषणाबाजी, मिरवणूक किंवा शक्ती प्रदर्शन टाळावे. अफवा, भडक वक्तव्य किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून चुकीची माहिती प्रसारीत करु नये. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, उमेदवार अथवा राजकीय पक्षाविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, त्यामुळे संबंधीतांनी संयम, शिस्त जबाबदारीने वागावे, असे आवाहन जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी केले आहे.

## बॉलिवूड अभिनेत्री नोरा फतेहीच्या गाडीचा भीषण अपघात; मद्यधुंद ड्रायव्हरची समोरुन धडक, गाडीचा चक्काचूर

**मुंबई । प्रतिनिधी**

बॉलिवूड अभिनेत्री नोरा फतेहीचा भीषण अपघात झाला आहे. एका दारूच्या नशेत धुंद असलेल्या व्यक्तीनं नोराच्या गाडीला येऊन धडक दिली. महत्त्वाची अपडेट म्हणजे, नोरा पूर्णपणे ठीक आहे. तिला कोणतीही दुखापत झालेली नाही. नोराच्या गाडीला मद्यधुंद ड्रायव्हरनं समोरुन धडक दिल्यामुळे अपघात झाल्याची माहिती मिळत आहे.

नोराचा अपघात कधी आणि कसा झाला? शनिवारी रात्री नोरा फतेहीचा भीषण अपघात झाला. मीडिया रिपोर्टनुसार,



अभिनेत्री मुंबईत डीजे डेव्हिड ग्वेटा कॉन्सर्टसाठी जात असताना एका मद्यधुंद चालकानं तिच्या गाडीला धडक दिली. धडक एवढी जबर होती की, या अपघातात नोराच्या गाडीचं मोठं ▶ उर्वरित पान २ वर

## संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या बीडच्या वार्ड क्रमांक ३ मध्ये ७३.७ टक्के मतदान

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण बीड जिल्हयाचे लक्ष लागलेल्या आणि अत्यंत चुरशीची लढत असलेल्या बीड शहरातील वार्ड क्रमांक ३ ब मधील मतदान प्रक्रिया शनिवारी शांततेत पार पडली. या वार्डात बीड शहरात सर्वाधिक ७३.७ टक्के इतके मतदान झाले असून २ डिसेंबर रोजी याच वार्डातील प्रभाग ३ अ मध्ये । झालेल्या मतदानापेक्षा ६०० मतदान जास्त झाले असून जास्तीचे मतदान कोणाला फायदेशीर ठरते याची चर्चा सुरु आहे. दोन्ही उमेदवारांनी मुळचे पण बाहेरगावी असलेले मतदान मोठ्या प्रमाणात आणल्यामुळे मतदानाचा टक्का वाढल्याचे सांगण्यात येते. पोलिसांचं कौतुक टाईट भूमिका घेतली- बीड शहरातील प्रभाग क्रमांक ३ ब च्या निवडणुकीच्या मतदानाकडे अख्ख्या जिल्ह्याचे लक्ष लागले होते. गेली १० ते १२ दिवस या प्रभागात आरोप-प्रत्यारोप मोठ्या प्रमाणावर झाले त्यामुळे



मतदानाच्या दिवशी काही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी अख्खी यंत्रणा टाईट केली होती. ७ मतदान केंद्राच्या परिसरासह प्रभागात ठिकठिकाणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचाऱ्यांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सकाळी ७.३० पासून सायंकाळी ५.३० पर्यंत उभे राहत पोलिसांनी चोख कर्तव्य बजावले त्याबद्दल पोलिसांचे कौतुकच.

## महाराष्ट्रात शीत लहरींचा शिरकाव
## नीचांकी तापमान 4.5 अंशांवर, कुठं घसरला पारा?

**मुंबई । प्रतिनिधी**

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीर यांसारख्या राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढण्यास सुरुवात झाली असून त्याचा थेट परिणाम आता मध्य भारत, महाराष्ट्र आणि दक्षिण भारतापर्यंत दिसण्यास सुरुवात झाली आहे. केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार देशात 'कोल्ड डे' जाहीर होऊ शकतो इतका गारठा असेल असंही निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे.

कधी जाहीर होतो कोल्ड डे?

हवामान विभागाच्या निरीक्षणानुसार जेव्हा रात्री तापमानाचा आकडा १० अंशांहून कमी असतो आणि दिवसाचं तापमान ५ अंशांच्या घरात असतं तेव्हा त्या दिवसाला 'कोल्ड डे' असं म्हणतात. सध्या देशाच्या बहुतांश भागांमध्ये प्रामुख्यानं उत्तरेकडे अशी स्थिती पाहायला मिळत असल्यानं देशाच्या अनेक राज्यांमध्ये कोल्ड डेसम परिस्थिती असल्याचं चित्र आहे.




महाराष्ट्रात वाढली हुडहूडी! मागील २४ तासांमध्ये पुन्हा एकदा शीतलहरींनी महाराष्ट्रात शिरकाव केल्यानं किमान तापमान ६ ते ४.५ अंश सेल्सिअसवर पोहोचलं असून, राज्यातील ▶ उर्वरित पान २ वर

## अंबरनाथमध्ये २०८ बोगस मतदार, भिवंडीतून महिला आणल्या
## भाजपाचा शिवसेना शिंदे गटावर आरोप, नेमकं काय घडलं?

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह विविध जिल्ह्यांतील एकूण १४३ सदस्यपदांसाठी (२० डिसेंबर) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार असून राज्यातील अनेक मतदान केंद्रावर सकाळपासूनच मतदारांनी रांगा लावल्याचे पाहायला मिळत



आहे. अशातच अंबरनाथच्या कोहोजगाव परिसरातुन एक खळबळ उडवणारी बातमी समोर आली आहे. मतदानासाठी शेकडो महिलांची एका सभागृहात गर्दी जमली असून हे मतदार बोगस असल्याचा राजकीय पक्षांनी आरोप केलाय. या प्रकरणानंतर काँग्रेस आणि भाजपचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले असून इथलं वातावरण आता तापलं आहे.

काँग्रेस व भाजप कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले, वातावरण तापलं- अंबरनाथच्या कोहोजगाव परिसरात एका ▶ उर्वरित पान २

## जालन्यात व्यावसायिकाने आयुष्य संपवलं, गाडीतच स्वत:च्या डोक्यात गोळी झाडली, घातपाताचा संशय



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात अंबड चौफुली जवळ एका व्यावसायिकाने पहाटेच्या सुमारास डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. सकाळी सहाच्या सुमारास काच लावलेल्या कारमध्ये हा मृतदेह आढळून आला. सागर धानोरे असे या व्यावसायिकचे नाव असून या घटनेने सकाळी शहरामध्ये खळबळ उडाली. मयताच्या नातेवाईकांनी या घटनेवर शंका उपस्थित केली आहे. सागर धानोरे याच्या नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. पोलिसांच्या फॉरेन्सिक टीमकडून घटनास्थळाची तपासणी होत असून पोलीसदेखील सीसीटीव्ही फुटेजच्य आधारे या घटनेचा कसून तपास करत आहेत. पोलिसांनी सागर धानोरे यांच्या गाडीची कसून तपासणी केली. सागर धानोरे यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. जालना पोलिसांची मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन घटनास्थळावर आली होती.

## हरवली आहे



**नाव: प्रतीक्षा विनायक पवार, वय: १९ वर्ष, पत्ता: इट तांडा, ता. बीड, जि. बीड**

येथील राहणारी मुलगी प्रतीक्षा विनायक पवार (वय १९) दिनांक १८/१२/२०२५ रात्री १० वाजल्यापासून हरवलेली आहे. आतापर्यंत तिचा काहीही पत्ता लागलेला नाही. कोणालाही ती दिसली असेल / काही माहिती मिळाली असेल तर कृपया तात्काळ खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा. अंगावर घातलेले कपडे पांढऱ्या रंगाचा ड्रेस

**मो नः ९८५०३३८४६२ संपर्क साधावा.**






## वनामकृविच्या खामगाव येथील केव्हिकेद्वारा आद्यरेषीय पीक प्रात्यक्षिकांतर्गत
## ईट (बीड) येथे तूर शेती दिन व पीक पाहणी कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, खामगाव (ता. गेवराई, जि. बीड), महाबीज बीड, कृषि विभाग, आत्मा तसेच पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आद्यरेषीय पीक प्रात्यक्षिक उपक्रमांतर्गत तूर शेती दिन व पीक पाहणी कार्यक्रम




दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी बीड तालुक्यातील मौजे ईट येथे यशस्वीरीत्या संपन्न झाला.

अध्यक्ष म्हणून माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि लाभले, उद्घाटक गोरक्षनाथ टेकडीचे महंत हभप नवनाथ बाबा तर प्रमुख अतिथी म्हणून विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (बीड) श्री सुभाष साळवे, महाबीजचे जालना येथील विभागीय व्यवस्थापक श्री राजाभाऊ मोराळे, तसेच महाबीज बीड जिल्हाचे व्यवस्थापक श्री अजय फुलझेले हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये इटचे सरपंच श्री गणपत डोईफोडे, उपविभागीय कृषि अधिकारी श्री उद्धव गर्जे, पानी ▶ उर्वरित पान २ वर



# २१ डिसेंबर – हिवाळी अयनांत : सर्वात मोठी रात्र आणि सर्वात लहान दिवस

# अंधारातून उजेडाकडे जाणाऱ्या निसर्गयात्रेचा शाश्वत संदेश

निसर्ग कधी बोलत नाही , पण तो सतत शिकवत असतो. दिवस आणि रात्र , ऊन आणि सावली , थंडी आणि उष्णता , बीज आणि अंकुर , पीक आणि धान्य – या साऱ्या प्रवाहामागे एक अचूक आणि शाश्वत नियम कार्यरत असतो. २१ डिसेंबर हा दिवस त्या नियमाचा जिवंत अनुभव देणारा दिवस आहे. या दिवशी उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात मोठी रात्र आणि सर्वात लहान दिवस अनुभवास येतो. या खगोलीय घटनेला हिवाळी अयनांत असे म्हटले जाते. हा दिवस केवळ आकाशातील गणितापुरता मर्यादित नसून तो निसर्ग , शेती , संस्कृती , तत्त्वज्ञान आणि माणसाच्या जीवनप्रवासाशी अतिशय घट्ट जोडलेला आहे.



पृथ्वीचा अक्ष सरळ नसून तो सुमारे तेवीस अंश झुकलेला आहे. याच झुकावामुळे पृथ्वी सूर्याभोवती फिरताना ऋतू निर्माण होतात. हिवाळी अयनांताच्या दिवशी सूर्याचे थेट किरण मकरवृत्तावर पडतात. परिणामी उत्तर गोलार्ध सूर्यापासून अधिक झुकलेले असते. सूर्यकिरण तिरपे पडतात , उष्णतेचा पुरवठा कमी होतो , दिवस लहान होतो आणि रात्र मोठी होते. या दिवशी सूर्याची आकाशातील उंची वर्षातील सर्वात कमी असते. सावल्यांची लांबी सर्वाधिक असते. मात्र याच क्षणापासून सूर्याचा उत्तर दिशेने प्रवास सुरू होतो आणि दिवस हळूहळू वाढू लागतात. म्हणूनच हिवाळी अयनांत म्हणजे अंधाराचा कळस आणि उजेडाची सुरुवात.

ग्रामीण जीवनात हिवाळी अयनांताचा अनुभव शास्त्रापेक्षा अधिक संवेदनशील पातळीवर जाणवतो. पहाटे दवबिंदूंनी झाकलेली पिके , धुक्यात हरवलेल्या शेतवाटा , गुरांच्या श्वासातून निघणारी वाफ , थंडीने कुडकुडणारी माणसं – या साऱ्या दृश्यांतून निसर्गाची शांत भाषा ऐकू येते. शेतकरी सहज म्हणतो , आता सूर्य वळायला लागला. या एका वाक्यात पुढील हंगामाची आशा दडलेली असते. रब्बी पिके वाढीच्या टप्प्यात असतात. गहू , हरभरा , ज्वारी , मसूर यांसारखी पिके थंडीला चांगला प्रतिसाद देतात. हिवाळी अयनांत म्हणजे शेतीच्या दृष्टीने स्थैर्याचा , विश्वासाचा आणि पुढील नियोजनाचा काळ.

भारतीय संस्कृतीत सूर्याला केवळ आकाशातील तारा म्हणून पाहिले गेले नाही , तर जीवनदाता मानले गेले. सूर्याच्या हालचालींवर आधारित पंचांग , ऋतूचक्र आणि शेतीव्यवस्था उभी राहिली. सूर्याचा दक्षिणायन आणि उत्तरायण प्रवास हा काळाच्या मोजमापाचा आधार ठरला. हिवाळी अयनांतानंतर सूर्याचा उत्तरायण प्रवास सुरू होतो. म्हणूनच अनेक ठिकाणी हा काळ शुभ मानला जातो. अंधार कमी होऊन प्रकाश वाढतो , ही कल्पना केवळ भौतिक नाही , तर मानसिक आणि आध्यात्मिकही आहे. ग्रामीण भाषेत काही ठिकाणी याला हिवाळी संक्रांत असेही संबोधले जाते , परंतु खगोलशास्त्रीयदृष्ट्या हा दिवस हिवाळी अयनांत म्हणूनच ओळखला जातो.

जगभरातील विविध संस्कृतींमध्ये या दिवसाला वेगवेगळ्या पद्धतीने महत्त्व दिले जाते. कुठे सूर्यपूजन केले जाते , कुठे दिवे लावून अंधार दूर करण्याची परंपरा आहे , तर कुठे निसर्गाशी एकरूप होण्याचे विधी केले जातात. या सर्व परंपरांच्या मुळाशी एकच भावना आहे – अंधारानंतर प्रकाशाचा विजय अटळ आहे. ही भावना मानवी जीवनालाही लागू पडते.

हिवाळी अयनांत माणसाला संयम शिकवतो. जीवनात असे टप्पे येतात जेव्हा अंधार वाढलेला वाटतो , मार्ग अस्पष्ट होतो , आशा क्षीण होते. पण निसर्ग सांगतो की अंधार हा शेवट नसतो. तो बदलाचा टप्पा असतो. जिथे रात्र सर्वात मोठी असते , तिथूनच दिवस वाढायला लागतो. म्हणूनच हा दिवस आशेचा , धैर्याचा आणि सातत्याचा आहे.

ग्रामीण समाजात आजही ज्येष्ठ लोक ऋतूंच्या हालचाली अचूक ओळखतात. सूर्याची दिशा , थंडीची तीव्रता , धुक्याचे प्रमाण , पिकांची अवस्था – या निरीक्षणांवरून ते पुढील काळाचा अंदाज घेतात. आधुनिक विज्ञानाने या गोष्टी मोजमापात मांडल्या , पण अनुभव तर गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपला आहे.

हिवाळी अयनांतानंतर दिवस संथपणे वाढू लागतात. ही वाढ हळू असते , पण निश्चित असते. त्यामुळे हा दिवस घाई न करता सातत्यावर विश्वास ठेवायला शिकवतो. बदल एका रात्रीत होत नाही , पण योग्य दिशेने सुरू झालेला प्रवास थांबत नाही.

निसर्ग जणू माणसाला सांगतो – रात्र मोठी झाली म्हणून घाबरू नको.

उजेड मागे नाही , तो वाटेत आहे.

थांब जरा , पाहा नीट.

सूर्य पुन्हा वर येणार आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात हिवाळी अयनांत आपल्याला थांबायला सांगतो. आकाशाकडे पाहायला , ऋतू जाणवायला , स्वतःच्या आत डोकावायला शिकवतो. अंधार आणि उजेड यांचे संतुलनच जीवन आहे , हे उमगायला लावतो.

म्हणून २१ डिसेंबर हा दिवस केवळ खगोलशास्त्राचा नाही. तो शेतीचा आहे , संस्कृतीचा आहे , तत्त्वज्ञानाचा आहे आणि माणूस म्हणून जगण्याचा आहे. अंधारातून उजेडाकडे नेणारी ही निसर्गयात्रा आपल्याला एकच शाश्वत संदेश देते – बदल अटळ आहे , आणि आशा अमर आहे.

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# जागतिक ध्यान दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व

२१ डिसेंबर हा दिवस जगभर जागतिक ध्यान दिन (थेीश्रव चशवळींरींळेप ऊरू) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ योग, ध्यान, विपश्यना किंवा अध्यात्माशी निगडित व्यक्तींसाठी मर्यादित नसून, आजच्या तणावपूर्ण, धावपळीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात प्रत्येक व्यक्तीसाठी आत्मपरीक्षण, मानसिक शांतता आणि जीवनातील समतोल साधण्याचा संदेश देणारा आहे. आधुनिक मानवाने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, माहिती आणि दळणवळणाच्या साधनांमध्ये अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु याच वेळी मानसिक तणाव, अस्वस्थता, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि असमाधान हे जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहेत. बाह्य प्रगतीच्या वेगात अंतर्मनाची गरज दुर्लक्षित होत चालली आहे. अशा पार्श्वभूमीवर ध्यान ही केवळ आध्यात्मिक साधना न राहता, मानसिक आरोग्य, सामाजिक सलोखा आणि मानवता जपण्यासाठी अत्यावश्यक साधन ठरत आहे. जागतिक ध्यान दिन हे या व्यापक समाजशास्त्रीय संदर्भाचे प्रतीक आहे आणि प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद साधण्याची संधी देते. मानव जीवनातील मानसिक अस्वस्थतेचे थेट प्रतिबिंब समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता अत्यंत गंभीर आहे. आजच्या समाजात सततची स्पर्धा, अपयशाची भीती, आर्थिक अस्थैर्य, सामाजिक अपेक्षांचा ओझा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या थकलेली आहे. कौटुंबिक कलह, घटस्फोट, व्यसनाधीनता, आत्महत्यांचे वाढते प्रमाण आणि सामाजिक हिंसा या सर्व समस्या या मानसिक असंतुलनाचे परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे वैयक्तिक मर्यादेत न राहता समाजाच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे. त्यामुळे मानसिकदृष्ट्या अस्थिर व्यक्तीचा परिणाम केवळ त्याच्या वैयक्तिक जीवनावर नाही, तर कुटुंब, शाळा, कामाचे ठिकाण आणि समाजावरही होतो. ध्यान ही प्रक्रिया व्यक्तीला या बाह्य तणावापासून दूर नेऊन स्वतःच्या अंतर्मनाशी जोडते, त्यामुळे मानसिक संतुलन निर्माण होते आणि व्यक्तीचे सामाजिक वर्तन अधिक सकारात्मक बनते.

ध्यानाची परंपरा प्राचीन मानवतेइतकीच जुनी आहे. भारतीय तत्त्वज्ञान, उपनिषद, योग, बौद्ध तत्त्वज्ञानातील मध्यम मार्ग, जैन धर्मातील आत्मशुद्धीचा विचार, सूफी संतांचे मौन व अंतर्मुखतेचे साधन, ख्रिस्ती मिस्टिसिझम (चूींळलळीा) किंवा चिनी ताओ तत्त्वज्ञान या सर्वच परंपरांमध्ये अंतर्मुखता, मौन आणि आत्मचिंतन यांना महत्त्व दिले गेले आहे. या परंपरांचा उद्देश केवळ वैयक्तिक मोक्ष किंवा अध्यात्मिक उन्नती नव्हता, तर समाजात करुणा, संयम, सहिष्णुता, नैतिकता आणि सामंजस्य निर्माण करणे हाच होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ध्यान व्यक्तीच्या अहंकाराला मवाळते आणि तिला समाजाशी अधिक सुसंवादी बनवते. जेव्हा व्यक्ती स्वतःच्या विचार-भावनांचे निरीक्षण करू लागते, तेव्हा ती इतरांच्या भावना समजून घेण्यास अधिक सक्षम होते. परिणामी, सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ होतात, संवाद सुधारतो आणि सामूहिक सहकार्य वाढते.

आधुनिक समाजात तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. भांडवलशाही, उपभोगवाद, सततची स्पर्धा, सामाजिक तुलना, आर्थिक अस्थैर्य, भविष्यातील असुरक्षितता आणि यशाची व्याख्या केवळ पद, पैसा आणि प्रतिष्ठेपुरती मर्यादित झाल्यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या तणावाखाली राहत आहे. सतत इतरांशी तुलना करणे, अपयशाची भीती, अपेक्षांचा भार आणि वैयक्तिक ओळखीचा संघर्ष हे मानसिक असंतुलन वाढवतात. ध्यानामुळे व्यक्ती या सततच्या तुलनांपासून व अपेक्षांपासून काही वेळ दूर राहू शकते, वर्तमान क्षणात जगण्याची सवय लागते आणि जीवनातील छोटे, साधे आनंद अनुभवता येतात. परिणामस्वरूप, व्यक्ती स्वतःच्या जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागते, मानसिक ताण कमी होतो आणि भावनिक स्थैर्य वाढते.

कौटुंबिक जीवनावर ध्यानाचा परिणामही महत्त्वाचा आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव, गैरसमज, वेळेची कमतरता आणि सततचा तणाव यामुळे नातेसंबंध ताणलेले आहेत. घरगुती वाद, संयमाचा अभाव, चिडचिड यामुळे कुटुंबात अस्थिरता निर्माण होते. ध्यानामुळे मन शांत झाल्यावर व्यक्ती संयमी, समजूतदार आणि संवेदनशील बनते. त्यामुळे संवाद सुधारतो, सहनशीलता वाढते, आणि कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतात. शांत मनातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा संपूर्ण घरच्या वातावरणावर परिणाम करते आणि सामाजिक सलोखा मजबूत होतो.

शिक्षणक्षेत्रात ध्यानाचे महत्त्व आज विशेषत्वाने जाणवते. विद्यार्थ्यांचे जीवन आज प्रचंड स्पर्धेने भरलेले आहे. परीक्षा, गुण, करिअर, पालकांच्या अपेक्षा आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असतात. लहान वयातच तणाव, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो. ध्यानामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते, भावनिक समतोल राखला जातो आणि शिकण्याची प्रक्रिया अधिक आनंददायी बनते. मानसिकदृष्ट्या संतुलित विद्यार्थी पुढे जाऊन समाजात अधिक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनतात. म्हणूनच शिक्षणसंस्थांनी ध्यानाचा समावेश करणे काळाची गरज आहे.

कामकाजाच्या ठिकाणीही ध्यानाचे महत्त्व मोठे आहे. दीर्घ कामाचे तास, कामाचा ताण, लक्ष्यपूर्तीची सततची धावपळ आणि नोकरीची असुरक्षितता यामुळे कर्मचारी मानसिकदृष्ट्या थकलेले असतात. याचा परिणाम कार्यक्षमतेवर, आरोग्यावर, वैयक्तिक जीवनावर आणि सामाजिक नात्यांवर होतो. ध्यानामुळे मन शांत राहते, निर्णयक्षमता सुधारते, तणाव कमी होतो आणि सहकाऱ्यांशी नातेसंबंध अधिक सौहार्दपूर्ण बनतात. त्यामुळे कार्यस्थळी सकारात्मक वातावरण निर्माण होते आणि उत्पादनक्षमता वाढते. स्त्रियांच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. अनेक पातळ्यांवर जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा, कौटुंबिक भूमिका आणि स्वतःची ओळख जपण्याचा संघर्ष यामुळे स्त्रिया मानसिकदृष्ट्या थकतात. स्वतःसाठी वेळ काढणे अनेकदा त्यांना शक्य होत नाही. ध्यान स्त्रियांना स्वतःशी जोडते, अंतर्मनाचा आवाज ऐकायला शिकवते आणि भावनिक बळ देते. मानसिकदृष्ट्या सक्षम स्त्री ही कुटुंबात शांतता आणि समाजात सकारात्मकता पसरवू शकते. त्यामुळे ध्यान केवळ वैयक्तिक नाही तर सामाजिक आरोग्यासाठीही महत्त्वाचे ठरते.

डिजिटल युगात ध्यानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि सतत उपलब्ध असलेली माहिती यामुळे मनाला विश्रांती मिळत नाही. सतत येणाऱ्या सूचना, संदेश आणि आभासी जगातील तुलना यामुळे असमाधान, एकाकीपणा आणि तणाव वाढतो. अनेकदा लोक आभासी जगात अधिक आणि वास्तवात कमी जगताना दिसतात. ध्यान ही प्रक्रिया माणसाला या डिजिटल गोंगाटातून बाहेर काढते, स्वतःच्या वास्तवाशी जोडते आणि मन शांत ठेवते. काही काळ श्वासावर लक्ष केंद्रित केल्यास मानसिक ताण कमी होतो.

–डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान ४ वरून पुढे...

## विवाहितेला मारहाण....

काहीही करू शकतात, अशी भीती व्यक्त केली आहे. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी व मला न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा बीड जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## महाजनवाडीकरांचा भाववाढीच्या...

हनुमान मंदिरात शेतकरी पुत्र डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या पुढाकाराने शेतकरी जनजागृती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मोठ्या संख्येने शेतकरी, शेतकरी पुत्र व शेतकरी मित्र उपस्थित होते. सरपंच विश्वंभर गिरी यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या वतीने मोर्चामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार जाहीर केला. यावेळी राजेभाऊ क्षीरसागर, सुदाम सुरवसे, शेषराव मेंगडे, बंकट शिरसाठ, रामचंद्र घरत, जयराम घरत, बाबुराव भोसले, अशोक भोसले, आप्पासाहेब घरत, शंकर घरत, अर्जुन जगदाळे, परमेश्वर घरत, शिवाजी घरत, नामदेव घरत, लक्ष्मण गायकवाड, पंडित आवटे, भागवत घरत, विनायक घरत, विठ्ठल घरत, काकासाहेब घरत, मधुकर घरत, महारुद्र घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## कानडी घाट ...

तसेच संस्थेचे प्रशासक डॉ. व्हि. टी. देशमाने, डॉ. श्री गुट्टे तसेच कानडी घाट हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री एम.एन. कसबे सर, चौसाळा बीटच्या जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी व मित्र परिवार यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच जानेवारीत होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

## तलवाडा वार्ड...

यांनी आपले दोन खंदे सर्मथक आसलेले कार्यकर्ते शेख लालाभाई व इस्माइलभाई(मिठ्ठू दादा) शेख यांच्यावर सोपवली होती. येणा-या आणेक आडथळ्यांना सामोरे जात शेवटी शेख लालाभाई व इस्माइल शेख यांनी मा. आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनात वार्ड क्रमांक ३ मधील सिमेंट रस्ता गुणवत्तापूर्ण व दर्जेदार स्वताह ऊभे राहून करुन घेतल्याचे सातत्याने निदर्शनास आलेले असुन रस्ता नंबर ऐकच झाल्याचे कवतुक पुर्व वार्डातील नागरिक बोलत असुन मा. आमदार अमरसिंह पंडित, ग्रामविकास अधिकारी मुसळे साहेबासह शेख लालाभाई व इस्माइल शेख यांचे वार्ड क्रमांक ३ मधील नागरिक आभार व्यक्त करतांना दिसुन येत आहे.

## संघर्षातून शौर्याकडे...

सुरू ठेवले. या संपूर्ण काळात त्यांचे आजोबा महादेव गायकवाड यांची मोलाची साथ लाभली. आजोबा जेव्हा जेव्हा बीडमध्ये येत, तेव्हा घरून भाकरी बांधून नातवासाठी आणत असत. नातवाच्या या यशाने आजोबांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आणि संपूर्ण महाविद्यालयात अत्यंत भावनिक वातावरण निर्माण झाले. रोहित गायकवाड हे कोळगाव, तालुका गेवराई येथील रहिवासी असून, त्यांच्या कुटुंबातील पहिलाच विद्यार्थी शासकीय सेवेत दाखल झाला आहे. त्यामुळे त्यांच्या गावातही अभिमानाचे वातावरण आहे.

या सत्कार समारंभाच्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे यांनी रोहित यांचे विशेष कौतुक करून, संघर्ष, कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असे मत व्यक्त केले. या सत्कार समारंभास महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्कॉर्पिओची जोरदार....

ग्रामस्थांनी केली आहे. खाजाभाई सय्यद यांच्या निधनाने एका हसत्याखेळत्या कुटुंबाचा आधार हिरावला गेला असून, महामार्गावर मृत्यूचे तांडव कधी थांबणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## २६४ नगरपरिषद,...

त्यामुळे या निवडणुकीकडेही जिल्ह्याचे लक्ष आहे. परळीत आ. धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रथमच नगपालिका निवडूक ही एकत्रित लढविली. त्यांना शरद पवारांच्या राष्ट्रवादी ने आव्हान दिले होते. त्यामुळे या निकालाकडेही लक्ष असणार आहे. धारूरमध्ये तिरंगी लढत झालेली आहे. आता १९ दिवसांच्या प्रतिक्षेनंतर

## बॉलिवूड अभिनेत्री...

नुकसान झालं आहे. सुदैवानं या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मुंबई पोलिसांनी नोरा फतेहीच्या अपघाताबाबत माहिती जाहीर केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिनेत्री नोरा फतेहीचा मुंबईत रस्ता अपघात झाला. एका मद्यधुंद चालकानं तिच्या गाडीला समोरुन धडक दिली. गाडीचं मोठं नुकसान झालंय मात्र, तिला कोणतीही दुखापत झालेली नाही. तिला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, जिथे तिची प्रकृती स्थिर आहे. मद्यधुंद चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि त्याला ताब्यात घेण्यात आलं आहे.

## महाराष्ट्रात शीत...

नीचांकी तापमानाची नोंद निफाड इथं करण्यात आली. जिथं पारा ४.५ अंशांवर पोहोचला होता. जळगावसह उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पारा घसरला असून, पुढील २४ तासांसाठी ही स्थिती कायम राहील. मुंबई शहर आणि उपनगरांसह कोकणातील बहुतांश भागांमध्येसुद्धा रात्री आणि पहाटेच्या वेळी गारठा तर, दुपारच्या वेळी सूर्याचा दाह नागरिकांना सोसावा लागणार आहे. हवामान तज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांच्या माहितीनुसार उत्तर भारतात किमान तापमानात सातत्यानं घट होत असल्यामुळं महाराष्ट्रावर त्याचा थेट परिणाम होत असून पुढील चार ते पाच दिवस हीच स्थिती कायम असेल.

◆ पान ९ वरून पुढे...

## अंबरनाथमध्ये २०८...

सभागृहात मोठ्या प्रमाणात पहाटेच्या सुमारास महिला आणि पुरुष जमले होते. हे सगळे लोक बोगस मतदान करण्यासाठी आणले असल्याचा आरोप काँग्रेस व भाजपच्या कार्यकर्त्यांनी केलाय. दरम्यान काँग्रेस व भाजप कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी इथे गोंधळ घातला, या महिला बोगस मतदान करण्यासाठी प्रतिस्पर्धी उमेदवाराने आणल्याचा आरोप काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलाय. या संदर्भात पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी या सभागृहातील महिलांना बाहेर काढले. या महिला कुठून आल्या आणि खरंच या बोगस मतदान करण्यासाठी आल्या होत्या का? याची चौकशी आता केली जाते आहे. मात्र या सगळ्या प्रकारामुळे इथलं वातावरण तापलं आहे.

एकूण २०८ महिला आणि मुलं, हे लोक स्थानिक नाहीत

दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी माहिती देताना सांगितलं कि, अशी तक्रार आल्यानंतर खात्री-पडताळणी सुरू आहे. मोठ्या प्रमाणात जमलेल्या महिला आणि त्यांचं तिथे असण्याचं कारण शोधणे सुरू आहे. मात्र हे लोक स्थानिक नाहीत. एकूण २०८ महिला आणि मुलं यामध्ये आहेत. सगळेच भिवंडीवरून आले असल्याची माहिती आहे. फिरती पथकाकडून तपास सुरू आहे. लवकरच या प्रकरणाची माहिती समोर येईल अशी माहिती अंबरनाथ पोलिसांनी दिली आहे.

मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी दोन जणांना पकडलं- अंबरनाथ नगरपालिकेसाठी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर अंबरनाथ शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये दोन जणांना पैशाची पॉकिट वाटत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडलंय. त्यानंतर या दोन जणांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी भरारी पथकाच्या ताब्यात दिलंय. सध्या घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून पुढील कारवाई सुरू आहे. भाजपच्या उमेदवाराकडून हे पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## वनामकृविच्या खामगाव...

फाउंडेशनचे विभागीय समन्वयक श्री संतोष शिनगारे तसेच डॉ गिते हे लाभले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. दिपक पाटील, कृषि विस्तार विद्यावेता प्रा. अरुण गुट्टे यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय मार्गदर्शनात माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी विद्यापीठाचे कार्य शेतकरी देवो भव: या भावनेतून सुरू असल्याचे स्पष्ट केले. शेतकरी हा केवळ लाभार्थी नसून तो विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. बदलत्या हवामान परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक शेतीस प्रोत्साहन देणे काळाची गरज असल्याचे सांगत, पर्यावरणपूरक व शाश्वत शेती पद्धती स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.शेतकरी मजबूर नव्हे तर मजबूत झाला पाहिजे, यासाठी संशोधन, तंत्रज्ञान व विस्तार कार्याच्या माध्यमातून विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शेतकरी महिलांनी पुढे येऊन नेतृत्वाची भूमिका बजावावी, महिलाशक्तीच्या सहभागातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय शेतकरी केवळ उत्पादक न राहता शेतकरी उद्योजक बनला पाहिजे, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग व बाजारपेठेशी थेट जोड निर्माण करून उत्पन्नवाढ साधता येईल, असे मत माननीय कुलगुरूंनी व्यक्त केले. विद्यापीठ शेतकरी-केंद्रित संशोधन व प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांनी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शेतकरी-केंद्रित विस्तार कार्यक्रमांची सविस्तर माहिती दिली. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, शाश्वत शेती पद्धती व उत्पादनवाढीच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.डॉ. दिपक पाटील यांनी तूर पिकाचे सद्यस्थितीतील महत्त्व स्पष्ट करत पिक व्यवस्थापन करताना घ्यावयाच्या काळजीबाबत सखोल व उपयुक्त मार्गदर्शन केले. महाबीजचे श्री. मोराळे यांनी बियाणे, बीजोत्पादन प्रक्रिया तसेच महाबीज निर्मित विविध उत्पादनांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच श्री. सुभाष साळवे यांनी कृषि महाविस्तार प विषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती देत त्याचा प्रत्यक्ष उपयोग समजावून सांगितला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ. हनुमान गरुड यांनी केले. यावेळी शेतकरी श्री. रामप्रसाद डोईफोडे यांनी मनोगत व्यक्त करताना तूर पिकाच्या एसओपीवर आधारित गीत सादर केले तसेच तूर पिकाचे नियोजन, लागवड व व्यवस्थापनाबाबत आपले अनुभव मांडले. यानंतर श्री. रामप्रसाद डोईफोडे यांच्या शेतावर राबविण्यात आलेल्या आद्यरेषीय पिक प्रात्यक्षिक तूर शेतीची पाहणी करण्यात आली. या ठिकाणी प्रा. अरुण गुट्टे यांनी तूर पिकाच्या विविध टप्प्यांवरील व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन महाबीजच्या क्षेत्र अधिकारी कविता देवढे यांनी केले तर आभार प्रा. किशोर जगताप यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रगतशील शेतकरी श्री. रामप्रसाद डोईफोडे, कृषि विज्ञान केंद्राचे डॉ. तुकेश सुरपाम, डॉ. भैय्यासाहेब गायकवाड, श्री. गजेंद्र आढावे, श्री. दत्तप्रसाद वीर, श्री. विजयकुमार चांदणे, महाबीज, कृषि विभाग तसेच पानी फाउंडेशनचे श्री. महेश लाखे, श्री. संतोष शिनगारे, शिवलेश्वर मेदने व विशाल घोलप यांनी अथक परिश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आष्टी येथे 'गंगाई–बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार' जाहीर

## माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांना जीवन गौरव, रयतचे कुलगुरू डॉ.ज्ञानदेव म्हस्के, सुभाष सारडा, रमेश गुगळे, दत्ता काकडे सुशीलाताई मोराळे, दत्तात्रय हिरवे, डॉ.सोनवणे, रहेमान सय्यद यांना पुरस्कार जाहीर

कडा । प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे आष्टी येथील भगवान महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालयाच्या वतीने आयोजित गंगाई –बाबाजी कला रौप्य महोत्सव २०२५–२०२६' अंतर्गत विविध क्षेत्रांतील मान्यवरांना राज्यस्तरीय 'गंगाई–बाबाजी आदर्श पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत.बीड जिल्ह्यातील राजकारणातील पितामह भीष्म म्हणून ओळखले जाणारे माजी मंत्री शिवाजीराव पंडित (दादा) यांना गंगाई –बाबाजी रौप्य महोत्सवी वर्षातील जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.त्याचबरोबर बीड जिल्ह्यासारख्या दुष्काळी भागात उच्च शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल सुभाष सारडा यांना गंगाई बाबाजी शिक्षण क्षेत्रातील राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.डाव्या विचारसरणीची चळवळ अविरतपणे सुरू ठेवणाऱ्या आणि अन्यायाच्या विरोधात धावून जाणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुशीलाताई मोराळे यांना गंगाई बाबाजी आदर्श समाज सेविका राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. कडा येथील धडाडीचे निस्वार्थपणे समाजसेवेचे काम करणारे सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांना गंगाई–बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

### ● गंगाई– बाबाजी रौप्य महोत्सवाची उत्सुकता शिगेला

**सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री हेमांगी कवी यांच्या हस्ते २९ डिसेंबरला होणार उद्घाटन आष्टी येथील शेतकरी शिक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयाच्या वतीने आयोजित २५ व्या.गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाचे उद्घाटन सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी दुपारी १२ वा.आष्टी येथील भगवान महाविद्यालयात सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी माजी आ. भीमराव धोंडे हे राहणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली. आष्टी येथे संपन्न होणाऱ्या या गंगाई –बाबाजी रौप्य महोत्सवी कला महोत्सवाची जय्यत तयारी झाली आहे. आष्टी शहरात ठीकठिकाणी कार्यक्रमाचे भव्य फलक लावण्यात आले आहेत.**

● धार्मिक क्षेत्र :– धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रातील योगदानासाठी ह.भ.प. श्री.सखाराम जाधव महाराज (आळंदी),ह.भ.प. श्रीमती.सायली राऊत महाराज (आष्टी), ह.भ.प. श्री.मनोहर वासुदेव पोतदार महाराज (आष्टी), ह.भ.प.श्रीमती पुष्पाताई उमाप जगताप महाराज (तवलवाडी), ह.भ.प.श्रीमती हरुअक्का मेहत्रे महाराज (देविनिमगाव), ह.भ.प.श्री.राजेंद्र गंगाराम लोखंडे महाराज (पाटोदा),ह.भ.प. श्री.काशीनाथ महाराज (गणेशगड नागतळा ), ह.भ.प.श्री.अशोक भोसले महाराज (पारगाव) यांची निवड करण्यात आली आहे. क्रीडा पुरस्कार :– क्रीडा क्षेत्रात बाळासाहेब शेंदुरकर (धानोरा), राहुल जाधव (बाबाजी अकँडमी आष्टी), पै.बबन काशीद यांचा समावेश आहे.

● उच्च शिक्षण क्षेत्र :– डॉ. ज्ञानदेव मस्के, कुलगुरू (सातारा) सुभाष सारडा (बीड),डॉ.सतीशचंद्र सूर्यवंशी, (श्रीगोंदा) डॉ. वसंत माळी (उल्हासनगर मुंबई), प्रा.एन. एन. साबळे (बीड), प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे (बनसारोळा) यांचा समावेश आहे. शैक्षणिक विभाग :– माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण क्षेत्र विभागातून अर्जुन घुगे (घोटण–शेवगाव), बारामते तुकाराम (सालेवडगाव), कल्याण वाल्हेकर (आष्टी), संजय सोले (धनवडेवस्ती), रघुनाथ गोल्हार(पाटसरा) ,रवींद्र फुंदे (महिंदा), श्यामसुंदर घाडगे(बीड), मुकुंद लगड(हिवरा),सुहास साळवे(पिंपळनेर),सुधाकर गर्जे (आष्टी),श्रीमती नीता आघाव (आष्टी),राजू सानप (आष्टी),

भानुदास आविळे(पाटोदा), सुजाता जाधव(पारगाव जो.), अशोक इथापे (आष्टी), प्रा.अजित इथापे (दादेगाव), श्रीमती शेख मिनाज,पद्माकर गर्जे,श्रीमती चंद्रकला लाड, श्रीमती घाटोळे सारिका, सुर्यभान परमेश्वर गटकळ, सुरेश तळेकर, आत्माराम बारवकार यांचा समावेश आहे.उद्योजक विभाग :– रमेश गुगळे (जामखेड),एन.बी. धुमाळ(मांडवा), बाळासाहेब भुकन (कडा),विजयशेठ कोठारी (जामखेड), प्राणी मित्र :– रणजीत राऊत ( जामखेड)

● पत्रकारिता क्षेत्र :– जावेद पठाण (आष्टी), संतोष सानप (आष्टी), अशोक शिंदे (शिरुर), हरीदास शेलार (पाटोदा), अजय जोशी (बीड) शितलकुमार मोटे(सोलापुर), सुरेश जाधव (बीड), आण्णासाहेब साबळे (आष्टी), गहिनीनाथ पाचबैल (मातकुळी) यांचा समावेश आहे. कृषी विभाग :– सचिन होळकर (लासलगाव), शहाजी गुलाबराव भोसले,प्रा. दत्तात्रय ढवळे (पिंपरखेड),सुरेश धोंडीबा डाके (बेलवंडी–श्रीगोंदा), दत्तात्रय हिरवे (पारगाव–श्रीगोंदा) यांचा समावेश आहे. सामाजिक क्षेत्र :– सामाजिक कार्यासाठी रहेमान सय्यदअली सय्यद (कडा)गणेश अंबेकर (आष्टी), रावसाहेब पिंपळे (एकलव्य संघटना बीड),विजय दत्तू राजपूरे,प्रविण सुखदेव आटोळे (वाहिरा), श्रीमती वर्षा आजिनाथ शेरकर, समीर बादशहा शेख (पाटण सांगवी),महादेव दगडू भवर (आष्टी),सुखदेव पोकळे (आष्टी) माजी सैनिक रणजित चव्हाण (पिंपरखेड) यांचा समावेश आहे.

● आदर्श माता–पिता पुरस्कार :– आदर्श कुटुंब मूल्यांसाठी श्री व सौ.वैशाली भीमराव भोसले (आष्टी)व श्री व सौ.मंजिरी सुरेश पंडित (कडा –पुणे), श्री व सौ. सायरा सलीम शेख (आष्टी) यांचा समावेश आहे. कला क्षेत्र :– कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौतम खंडागळे (शेरी),श्रीरंग बोराडे (पुणे),अनिल बेद्रे (आष्टी) यांची निवड करण्यात आली आहे. आदर्श गोपालक :– पशुपालन व गोसंवर्धन क्षेत्रात कार्यरत गजानन कुलकर्णी (देवळाली) यांना आदर्श गोपालक पुरस्कार देण्यात येणार आहे. साहित्य क्षेत्र :– साहित्य क्षेत्रात योगदानासाठी राम निकम (सेलू, परभणी),बाबाराव मुसळे (वाशीम बुलढाणा), भागवत मसने (अंबाजोगाई),प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर (छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश होणार आहे. आदर्श वकील :– कायदा क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी ड.बाबुराव अनारसे (आष्टी) ड.दत्तात्रय सयाजी ससाणे (आष्टी)यांचा समावेश आहे. आदर्श सरपंच :– ग्रामविकासासाठी दत्ता काकडे (सरपंच परिषद,महाराष्ट्र राज्य), ज्ञानदेव सासवडे (साकत – कोयाळ), बबीता पाडवी (नंदुरबार ), श्रीमती सुषमा डिसले (जळगाव–खांदेश),श्रीमती सौ.वंदना परीवंत गायकवाड (क–हेवडगाव) यांचा समावेश आहे. वैद्यकीय क्षेत्र :– आरोग्य सेवेसाठी प्रसिद्ध डॉ. विलास सोनवणे (आष्टी),डॉ. राहुल टेकाडे (आष्टी), डॉ.सचिन चाळक (आष्टी) यांचा समावेश असून हे पुरस्कार वितरण समारंभ गुरुवार दि.१ जानेवारी २०२६ रोजी आष्टी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.या निवडीमुळे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### ● संयोजन समितीचे उत्कृष्ट नियोजन

**भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य स्टेज उभारण्यात आले असून हजारो प्रेक्षकांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.दुचाकी व चार चाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे अशी माहिती संयोजन समितीने दिली.**

### ● कर्तुत्वान व्यक्तींचा पुरस्काराने होणार सन्मान!

**साहित्य,सामाजिक कार्य,जीवनगौरव, शिक्षण,पत्रकारिता, कला,क्रीडा,कृषी, अध्यात्म,शौर्य, प्राणी मित्र,आदर्श माता पिता, आदर्श अधिकारी,उद्योग, विधी, वैद्यकीय सेवा आदि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.**




### ● उपस्थित राहण्याचे आवाहन

**या कार्यक्रमास आष्टी पंचक्रोशीतील कला,साहित्य, रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे, संस्थेचे संचालक डॉ.अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य दत्तात्रय वाघ व संयोजन समिती सदस्यांनी केले आहे.**

# महास्ट्राईड प्रकल्पा अंतर्गत वार्षिक जिल्हा कृती आराखड्याबाबत बैठक संपन्न

परभणी । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला गती देण्याच्या दृष्टीने शुक्रवारी (दि.१९) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे बैठक संपन्न झाली. महास्ट्राईड (चरहरडढठखऊए) प्रकल्पांतर्गत वार्षिक कृती आराखड्याची मांडणी व अंमलबजावणी यावर चर्चा करण्यासाठी प्राथमिक, दुय्यम व तृतीय क्षेत्रांतील प्रमुख हितधारक या बैठकीस उपस्थित होते.

या चर्चेचा मुख्य उद्देश हा परभणी जिल्ह्याच्या सकल जिल्हाअंतर्गत उत्पादनात लक्षणीय योगदान देण्यासाठी कृतीक्षम मार्ग निश्चित करणे हा होता. पारंपरिक प्रशासकीय चौकटीपलीकडे जाऊन शेती, उद्योग व सेवा क्षेत्र यांचा समन्वय साधणारा सर्वसमावेशक विकास दृष्टिकोन स्वीकारण्याचा प्रशासनाचा मानस आहे.



प्रमुख भाषणात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी विद्यापीठात झालेल्या चर्चेदरम्यान आपली मते मांडली. त्यांनी वार्षिक कृती आराखडा हा नवोन्मेष व टिकाऊपणा वाढविणारा 'जिवंत दस्तऐवज' असावा, असे नमूद केले. चर्चेत शेती हे परभणीचे कणा असल्याचे स्पष्ट करण्यात आले; मात्र शाश्वत विकासासाठी कृषी संलग्न क्षेत्रांमध्ये विविधीकरण आवश्यक असल्यावर भर देण्यात आला. महास्ट्राईड प्रकल्पाअंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे रिसर्च पार्क (संशोधन उद्यान) स्थापन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. कृषी विद्यापीठ, शासन व शेतकरी यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणारा हा प्रकल्प कृषी व कृषी संलग्न क्षेत्रांमध्ये नवोन्मेष, संशोधन, उद्योजकता व कौशल्य विकासाला चालना देऊन जिल्ह्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (ऋज्झ) वाढ करण्याच्या उद्देशाने प्रस्तावित आहे. प्रस्तावित रिसर्च पार्कद्वारे कृषी आधारित स्टार्ट–अप्स, कृषी प्रक्रिया उद्योग तसेच संशोधनाधारित उपक्रमांना पाठबळ देण्यात येणार असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

चर्चेतील प्रमुख मुद्दे : खालील क्षेत्रांच्या कार्यक्षम विकासासाठी नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण करण्यात आली.

शेती संलग्न क्षेत्रे : मत्स्यव्यवसाय व पशुधन–दुग्धव्यवसायाचे आधुनिकीकरण करून उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या रणनीती.

रेशीम उद्योग (सेरीकल्चर) : रेशीम उत्पादनाला उच्च मूल्याचे नगदी पीक म्हणून प्रोत्साहन देणे.

मूल्यवर्धन : काढणीपश्चात नुकसान कमी करण्यासाठी व स्थानिक रोजगारनिर्मितीसाठी कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणे.

फलोत्पादन (हॉर्टिकल्चर) : निर्यातक्षम दर्जाच्या फळे व भाजीपाला पिकांच्या लागवडीचा विस्तार करणे. नवीन विकास स्रोत : जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून पर्यावरण पर्यटन (इको–टुरिझम) विकसित करण्याच्या शक्यता, ज्यातून तृतीय क्षेत्रातील उत्पन्नात वाढ होईल. बैठकीच्या समारोप सत्रात एक जिल्हा एक उत्पादन (जऊज्झ) उपक्रमावर विशेष चर्चा करण्यात आली. परभणीच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांचे ब्रँडिंग, विपणन व पुरवठा साखळी व्यवस्थापन यावर सविस्तर चर्चा करून ती उत्पादने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचविण्याबाबत रणनीती ठरविण्यात आल्या, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला थेट चालना मिळेल. महास्ट्राईड प्रकल्पाबाबत जिल्हा प्रशासनाने आपली ठाम वचनबद्धता पुनः अधोरेखित करत सांगितले की, या बैठकीतील सर्व सूचनांचा समावेश करून अंतिम वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात येईल व त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल.

या बैठकीस संचालक (कृषी) डॉ. बी. व्ही. आसेवार, संचालक (संशोधन) के. एम. बेग, संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. राकेश आहेरी, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण, उपसंचालक (पशुसंवर्धन) तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे प्राध्यापक व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी

नेकनुर । प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ढास डी.के. हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. मातकर व्ही.बी. हे उपस्थित होते. सर्वप्रथम अध्यक्षांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.इनकर व्ही.एस. यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख प्रा.मुजावर एस.टी. यांनी केले. प्रा. मातकर व्ही.बी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संत गाडगे महाराज यांच्या स्वच्छते विषयी माहिती सांगितली तसेच विद्यार्थ्यांनी आपला देश आरोग्य संपन्न करायचा असेल



तर आपल्या घरापासून स्वच्छतेला सुरुवात केली पाहिजे व आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे तरच आपले आरोग्य चांगले राहील यासाठी आपण संत गाडगे महाराज यांचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांनी विद्यार्थ्यांना संत गाडगे महाराज यांच्या विचाराचे आपण अनुकरण करून आपले आरोग्य चांगले ठेवले पाहिजे.आणि स्वच्छते विषयी महत्त्व सांगितले तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रा. मस्के व्ही.बी. यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव सामनापूर (नदी कडील परिसर)ता. जि.बीड येथे संत श्री गाडगे बाबा यांच्या स्मृतीदिनी निमित्त स्वच्छ भारत अभियान राबवले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष यांनी स्वच्छतेचे महत्त्व सर्वांना पटून दिले. यावेळी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष सौ छाया दिलीप पवार,सचिव तेजस पवार, सदस्य तेजस्विनी पवार व गावकरी उपस्थित होते*

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कार्याबाबत दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वासू ठेवू नये : व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख

परभणी । प्रतिनिधी

अलीकडच्या कालावधीत काही समाजमाध्यमांद्वारे तसेच काही व्यक्तींद्वारे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत सुरू असलेल्या कार्यवाही विषयी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्रसारीत करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाबीमुळे महामंडळाची बदनामी होत असून प्रामुख्याने मराठा समाजामध्ये व जनसामान्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी महामंडळाविषयी प्रसारीत होत असलेल्या कोणत्याही अफवा अथवा चुकीच्या माहितीवर मराठा बांधवांनी अगर सर्वसामान्य नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत विविध शासकीय विभाग, महामंडळे व शासन अंगीकृत उपक्रम इत्यादीसाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाद्वारे तरतूद निश्चित करण्यात येते व ती विधीमंडळास सादर केली जाते. सदरच्या अंदाजपत्रकास विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर अंदाजपत्रकाची अंमलबजावणी होत असते. अंदाजपत्रकातील वित्तीय मर्यादेत प्रत्येक शासकीय विभागास, महामंडळास तसेच शासन अंगीकृत उपक्रमांस वार्षिक इष्टांक निश्चिती करणे आवश्यक असते. राज्यातील इतर आर्थिक विकास महामंडळांप्रमाणेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत देखील वार्षिक इष्टांक निश्चितीची कार्यवाही करण्यात येत असून, त्या इष्टांकाच्या मर्यादितच वित्तीय दायित्व निर्माण करणे हे नियमानुसार बंधनकारक आहे. सध्या राज्यामध्ये महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झालेल्या असून काही नगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. निवडणूक कालावधीत राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर आदर्श आचारसंहितेचे पालन करणे सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे तसेच शासन अंगीकृत उपक्रमांवर बंधनकारक आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकृत वेबप्रणालीवर उपलब्ध आहे.

सबब, आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या अनुषंगाने केवळ महानगरपालिका क्षेत्र तसेच निवडणुका प्रलंबित असलेल्या नगरपालिका व नगरपरिषदांच्या हद्दीमध्येच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त उर्वरित राज्यामध्ये पात्रता प्रमाणपत्र देणेची कार्यवाही नियमितपणे सुरु आहे. आदर्श आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर व निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, वरील नमूद क्षेत्रांमध्ये पात्रता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही नियमानुसार पूर्ववत सुरू करण्यात येईल, असे श्री. देशमुख यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## जाहिर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १८६० / २०२५**
**कौशल्या विरूध्द निरंक**

अर्जदार १. कौशल्या भ्र. अनंता लोखंडे, वय – ७३ वर्षे, धंदा– घरकाम, रा. नेकनुर, ता. जि. बीड, २. शकुंतला भ्र. भागवत भटे, वय – ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोनपेठवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अनंता हरिभाउ लोखंडे यांचा मृत्यु झाला, यांचे

वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत अनंता हरिभाऊ लोखंडे यांचा मृत्यु दिनांक २७/०९/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा क्र. १ व २ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत अनंता हरिभाऊ लोखंडे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ व २ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अनंता हरिभाऊ लोखंडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९ / १२ / २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०१/२०२६ आहे.

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८९८/२०२५**

अर्जदार– १) मधुकर पि. नारायण नागरगोजे, वय ६१ वर्षे, धंदा–शेती, रा. वडगांव (गुंधा) ता. जि. बीड. २) सुधाकर पि. नारायण नागरगोजे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वडगांव (गुंधा) ता. जि. बीड. (३) सुबाबाई भ्र. अशोक चोले, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकी देवळा ता. वडवणी, जि. बीड. (४) विमल भ्र. रामराव खेडकर, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. चकलंबा, ता. गेवराई जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे नारायण पि. मल्हारी नागरगोजे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे नारायण पि. मल्हारी नागरगोजे, रा. वडगांव गुंधा, ता. जि. बीड हया दिनांक ०५/०९/२०२३ रोजी मौजे वडगांव गुंधा येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी नामे गवुबाई भ्र. नारायण नागरगोजे या दिनांक २५/०३/२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचे आई वडील हे ब–याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक २०/ ०१ / २०२६

आज दिनांक १८ / १२ / २०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
(ॲड. खाडे एस. बी. यांच्यामार्फत)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ ● पान ४

## कर्मयोगी संत गाडगेबाबा महाराजांची पुण्यतिथी साजरी



**वडवणी । प्रतिनिधी**

दिनांक २०/१२/२०२५ शनिवार रोजी वडवणी शहरातील परीट धोबी समाजाच्या वतीने वडवणी शहारात महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक संत, किर्तनकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक स्वच्छतेचे पुढारक संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेचे नगरसेवक नागेश भाऊ डिगे व माजी नगरसेवक कचरु दादा जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून पुजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी नगरसेवक नागेश डिगे यांनी संत गाडगेबाबा एक समाजसुधारक आहेत .संताची आठवण म्हणून गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.ज्यांचे खरे नाव देवीदास डेबूजी झिंगराजी जाणोरकर होते, हे महाराष्ट्रातील एक थोर संत, समाजसुधारक आणि मानवतावादी विचारांचे प्रणेते होते. त्यांची पुण्यतिथी २० डिसेंबर रोजी साजरी केली जाते. या दिवशी त्यांच्या कार्याची आठवण ठेवून, त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी गोष्टींना उजाळा देणे हे आपले कर्तव्य आहे.संत गाडगे बाबाने स्वच्छता अभियान, देव दगडात नसून तो माणसांत आहे.आसा जगाला शिकवण देऊन कार्य केले आहे.असे मनोगत व्यक्त करुन अभिवादन केले.यावेळी साळुजी जाधव, दत्तात्रय आप्पा जमाले, अर्जुनराव मोतुळे, संतोष जाधव, रामेश्वर मोतुळे, पत्रकार नारायण जाधव, पत्रकार शंकर झाडे, बब्रवान राऊत,अजय राऊत, शामराव शिंदे, गोरख शिंदे, पवन मोतुळे, गणेश झाडे, संदिप जाधव, शंकर पवार, गोविंद जाधव, विजय धुमाळ, ओम जाधव इ.समाज बांधवांनी उपस्थित राहुन अभिवादन केले.

# न. प. निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील उपद्रवी इसमांना प्रवेशबंदी

**बीड । प्रतिनिधी**

आगामी बीड नगर परिषद निवडणूक निकाल शांततेच्या व निर्भय वातावरणात पार पडावा, यासाठी बीड शहर पोलीस प्रशासनाने कडक प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. बीड शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व निवडणूक अनुषंगाने दाखल गुन्ह्यांतील एकूण ०८ उपद्रवी इसमांना बीड शहरात प्रवेशबंदी घालण्यात आली आहे. पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, बीड शहर यांनी रेकॉर्डवरील, बेकायदेशीर कृत्य करणारे व गुन्हेगारी प्रवृत्तीचे इसम यांच्याविरुद्ध कलम १६३ बी.एन.एस.एस. अन्वये प्रस्ताव तयार करून तो मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांच्या कार्यालयात सादर केला होता. त्या प्रस्तावावर आदेश पारित करत दिनांक २०/१२/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजल्यापासून ते २१/१२/२०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत संबंधित इसमांना बीड शहर हद्दीत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवेशबंदी आदेश बजावण्यात आलेल्या इसमांमध्ये शिवा नंदलाल गुरखुदे, आकाश राजेंद्र खांबे, अन्सारी जिकवाउद्दीन मिन्हाजुद्दीन, जयदीप उर्फ कृष्णा मुळे, सय्यद आजीम सय्यद नईम, सुमित सुनिल तुसांबड, सागर संपतराव झेंडे व अरबाज खान फिरोज खान यांचा समावेश आहे. सदर इसमांना दिलेल्या कालावधीत बीड तालुक्यात प्रवेश न करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. तरीही संबंधित इसम बीड शहरात आढळून आल्यास तात्काळ स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस विभागामार्फत नागरिकांना करण्यात आले आहे. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कवट, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी केली आहे.

## विवाहितेला मारहाण व जीवे मारण्याच्या धमक्या; पतीसह सासरच्या पाच जणांविरोधात पोलिसात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात महिलांची सुरक्षितता ऐरणीवर आली असून, शहरातील एका धक्कादायक घटनेमुळे खळबळ उडाली आहे. पंचवीस लाख रुपयांच्या हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रेश्मा महेश भांगे (रा. बीड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पती महेश भांगे, सासरा, सासू, दीर व दोन नंदा यांनी वारंवार पंचवीस लाख रुपये आणण्याची मागणी करत आपल्याला मानसिक त्रास दिला. मागणी पूर्ण न झाल्याने त्यांना मारहाण करण्यात आली तसेच जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्या, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. कौटुंबिक हिंसाचार, शारीरिक मारहाण, मानसिक छळ व धमकी या प्रकारांमुळे अखेर कंटाळून रेश्मा भांगे यांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार सासरच्या सहा जणांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.दरम्यान, पीडित विवाहितेने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत, माझ्या व माझ्या लहान मुलाच्या जीवाला सासरच्या लोकांकडून धोका आहे. हे लोक पैशाचे व सोन्याचे लोभी असून ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाजनवाडीकरांचा भाववाढीच्या शेतकरी हक्क मोर्चात सहभागी होण्याचा निर्धार : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन, तूर आदी शेतमालाला वाढीव दर मिळावा, सीसीआय व जिनिंग केंद्रांवरील शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवावी, तसेच हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या प्रमुख



मागण्यांसाठी होणाऱ्या शेतकरी हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. दि. २५ डिसेंबर (गुरुवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे काढण्यात येणाऱ्या धडक शेतकरी हक्क मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामार्फत राज्य सरकारने कापसाला १२ हजार रुपये, सोयाबीनला ७ हजार रुपये व तुरीला १२ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव जाहीर करावा, अशी ठाम मागणी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज दि. २० (शनिवार) रोजी महाजनवाडी येथील ▶▶ उर्वरित पान २ वर

## कानडी घाट हायस्कूलच्या रमेश जाडकर सरांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**चौसाळा । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या समन्वयातून शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या विभाग स्तरीय स्पर्धेत एकूण विविध ४२ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन या वर्षात केलेले आहे. राज्यातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी यातीलच निमेशन सादरीकरण स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी १८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक विद्या प्राधिकरण पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर विभागातील प्रत्येक तालुक्यातून प्रथम आलेल्या स्पर्धकांची विभागीय स्तरीय निमेशन सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. यात स्पर्धेत नवगण शिक्षण संस्था, बीड च्या कानडी घाट हायस्कूल कानडी घाट ता. जि. बीड या शाळेचे गणित विषय शिक्षक रमेश जाडकर सरांची विभागीय स्पर्धेत उत्तम कामगिरी करत क्रमांक पटकाविला.

जानेवारी महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या कामगिरी करिता नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर ▶▶ उर्वरित पान २ वर

सुरू ठेवले. या संपूर्ण काळात त्यांचे आजोबा महादेव गायकवाड यांची मोलाची साथ लाभली. [illegible] भाकरी बांधून नातवासाठी आणत असत. नातवाच्या [illegible] आणि संपूर्ण महाविद्यालयात अत्यंत भावनिक वातावरण निर्माण झाले.

## तलवाडा वार्ड क्रमांक ३ मध्ये भैय्या साहेबांनी कमालच केली शेख लालाभाई व इस्माईल शेख यांच्या देखरेखीत रस्ता एक नंबरच झाला

**तलवाडा । प्रतिनिधी**

[illegible] ग्रामपंचायत [illegible] निवडनुकित [illegible] तालुक्याचे नेते राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीचे सचिव मा. आमदार अमरसिंह पंडित यांच्या ताब्यात असुन विकासात्मक दूरदृष्टि आसलेल्या नेत्यात मा. आमदार अमरसिंह पंडित यांची राजभरात नाव लौकीकता आसल्याचे तलवाडा करांच्या ऐकिवात होते. त्या अनुषंगाने तलवाडा करांनी गत पंचवार्षिक निवडनुकित येथील ग्रामपंचायतची सत्ता त्यांच्या ताब्यात दिली. आणी तलवाडा करांना मा. आमदार अमरसिंह पंडित यांच्या विकासात्मक दूरदृष्टिचा प्रतय जाणु लागला. आणेक योजना तलवाड्या राबवल्या गेल्या व राबवल्या जात आसल्याचे निदर्शनास येत आहे. विकासात्मक आणेक कामे पूर्वी देखील या ठिकाणी झालेली होती. परंतु दर्जात्मक कामांचा आभाव तलवाडा करांना सातत्याने जाणवत होता. तलवाडा ग्रामपंचायतचा सत्ता बदल नक्किच सत मार्गी लागल्याचे ऊदगार गावक-यातुन ऐकावयास मिळत असुन तलवाड्यात विविध विकास कामाची भर पढत आसतांना भैय्या साहेबांच्या मार्गदर्शकतेत तलवाडा ग्रामपंचायतचे कर्तव्यदक्ष ग्रामविकास अधिकारी श्री सोपान मुसळे विविध विकास कामाला गती देत दर्जेदार कामाचे एक ऊत्तम व उत्कृष्ट उदाहरण वार्ड क्रमांक ३ मदिना चौक ते माळी गल्ली मुस्लिम मोहल्ला पोलीस स्टेशन कार्नर पर्यंत सिमेंट रस्त्याच्या कामात दाखऊन दिले. या कामाची सर्वत्र जबाबदारी व देखरेख मा. आमदार अमरसिंह पंडित ▶▶ उर्वरित पान २ वर



## संघर्षातून शौर्याकडे : श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या रोहित गायकवाडची भारतीय सैन्यात निवड

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचा (NCC) विद्यार्थी गायकवाड रोहित सुनील यांची भारतीय सैन्यात यशस्वी भरती झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.या प्रसंगी श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. आर. एच. भोसले व सचिव माननीय सौ. सरोज गोपाळराव सोंडगे यांनी रोहित यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस



मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या सत्कार समारंभास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी मोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख कॅप्टन डॉ. जगन्नाथ चव्हाण, तसेच प्राध्यापिका छाया सोंडगे व प्राध्यापिका वर्षाताई भोसले उपस्थित होत्या.

यावेळी कॅप्टन डॉ.जगन्नाथ चव्हाण यांनी रोहित यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाची माहिती देताना सांगितले की, रोहित हा ऊसतोड मजुराचा मुलगा असून घरात आजही अठरा विश्व दारिद्र्य आहे. त्याचे आई-वडील सध्या कारखान्यावर ऊस तोडणीसाठी गेलेले असून या आनंदाच्या क्षणी त्यांना केवळ फोनद्वारेच ही आनंदवार्ता कळवता आली.श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहून रोहितने शिक्षण पूर्ण केले. उदरनिर्वाहासाठी बीड शहरातील विविध मंगल कार्यालयामध्ये केटर्सच्या माध्यमातून पंक्ती वाढण्याचे काम तसेच मिळेल ते काम करून त्याने शिक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर

## मांजरसुंबा येथील ऊसतोड मजुराच्या मुलाची भारतीय सैन्य दलात भरारी

**मांजरसुंबा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील ऊसतोड मजूर अभिमान गायकवाड यांचा मुलगा दर्शन अभिमान गायकवाड याने भारतीय सैन्य दलाच्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी कामगिरी करत देशसेवेची सुवर्णसंधी मिळवली आहे. मांजरसुंबा या ग्रामीण भागातून भारतीय सैन्यात निवड होणारा तो पहिलाच युवक ठरल्याने संपूर्ण गावात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अत्यंत हलाखीच्या



परिस्थितीतून दर्शनने हे यश संपादन केले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी त्याचे आई-वडील दरवर्षी बाहेर राज्यात ऊसतोड मजुरीसाठी स्थलांतर करतात. अशा प्रतिकूल परिस्थितीतही दर्शनने शिक्षणात सातत्य ठेवत सैन्य भरतीसाठी कठोर परिश्रम घेतले. पहाटे लवकर उठून सराव, धावणे, व्यायाम आणि लेखी परीक्षेची तयारी त्याने जिद्दीने सुरू ठेवली. दर्शनच्या निवडीची माहिती मिळताच बाहेर राज्यात ऊसतोड मजुरी करणाऱ्या आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. आपल्या कष्टाचे चीज झाले, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. घरात आजी-आजोबांनीही नातवाच्या यशाबद्दल देवाचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

## वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर एक्सिस हॉस्पिटलचे तपासणी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार, २२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत रुग्ण तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहणार आहेत. या विशेष उपक्रमाचा उद्देश पोटविकारांचे लवकर निदान,पोटात किंवा छातीत जळजळ होणे, उलटी आणि संडासमध्ये रक्त पडणे कावीळ असल्यास, लिव्हर सिरोसीस किंवा लिव्हर संबंधी इतर कुठलाही आजार असल्यास ,हिपेटाईटीस बी किंवा हिपेटाईटीस सी चे संक्रमण झाले असल्यास, पित्ताशय किंवा पित्ताशयाच्या नलिकेमध्ये खडे असल्यास, गिळन्यास त्रास होत असल्यास तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत नागरिकांना प्रभावी मार्गदर्शन करणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून यात तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. या संदर्भात, सैय्यद हसीब सर यांनी एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल(माने पेट्रोल पंपाच्या मागे, नर्सरी रोड, बीड) तर्फे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या आरोग्याची काळजी घ्या आणि या संधीचा अवश्य लाभ घ्या.अधिक माहितीसाठी व पूर्वनोंदणीसाठी ९९२३०१०२०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराजांची पुण्यतिथी साजरी



**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय तसेच राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० डिसेंबर रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी श्रद्धाभावाने व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कदम एस. डी., प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री.आर.टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर.डी.लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना एस. सी. जगताप यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराजांचे कार्य अधोरेखित करताना सांगितले की, स्वच्छता, सेवाभाव आणि समाजप्रबोधन हे गाडगे महाराजांच्या जीवनकार्याचे केंद्रबिंदू होते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा व भोळ्या समजुती दूर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेस अर्पण केले. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## स्कॉर्पिओची जोरदार धडक, दुचाकी गाडीखाली अडकली; बीडमध्ये भयंकर अपघात, घराचा आधारवड गेला

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मांजरसुंबा ते नेकनूर या महामार्गावर एक भीषण अपघात घडला आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या एका अनियंत्रित स्कॉर्पिओने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत दुचाकीस्वार खाजाभाई सुलतान भाऊ सय्यद (रा. वाणगाव) यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाणगाव येथील रहिवासी असलेले खाजाभाई सुलतान सय्यद हे आपल्या दुचाकीवरून प्रवास करत होते. मांजरसुंबा-नेकनूर दरम्यान रस्त्यावर जात असताना, पाठीमागून अतिशय वेगात



येणाऱ्या एका स्कॉर्पिओ चालकाचे आपल्या वाहनावरील नियंत्रण सुटले. या भरधाव स्कॉर्पिओने खाजाभाई यांच्या दुचाकीला मागून जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की खाजाभाई यांचा जागीच प्राण गेला. वाणगाव गावावर शोककळा- खाजाभाई सय्यद यांच्या निधनाची बातमी वाणगाव परिसरात वाऱ्यासारखी पसरली. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. खाजाभाई यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा मोठा परिवार आहे. घराचा आधारवड गेल्याने सय्यद कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आज शोकाकुल वातावरणात वाणगाव येथे त्यांच्यावर दफनविधी करण्यात आला.

वाहतूक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मात्र, या घटनेमुळे महामार्गावरील वाढत्या अपघातांचा आणि बेशिस्त वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. महामार्गावर वाहने चालवताना वेगावर मर्यादा पाळली जात नसल्याने असे जीवघेणे अपघात घडत आहेत अशा भरधाव आणि बेजबाबदार वाहन चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ▶▶ उर्वरित पान २ वर